International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# माहिती तंत्रज्ञानाच्या युगात ऑनलाईन खरेदी – एक चिकित्सा

**प्रा. डॉ. वैशाली मेश्राम**

गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख, बाबाजी दाते कला आणि वाणिज्य, महाविद्यालय, यवतमाळ

मानवी जीवन हे वेगवेगळ्या गरजा व आकर्षणाला मोहित करणारे आहे व ते परस्परावलंबी असलेले दिसून येतात. निसर्गदत्त साधनांच्या सहाय्याने आपल्याला उपयोगी वस्तु निर्माण करण्यासाठी त्याचा उपयोग घेण्यासाठी व आपल्या जवळील जास्त प्रमाणात असलेल्या वस्तुंच्या मोबदल्यामध्ये आपल्याजवळ नसलेल्या वस्तु मिळविण्यात मनुष्याच्या क्रियाशील जीवनाचा जास्तीत जास्त भाग जात असतो आणि आपल्या जवळ असलेल्या वस्तुच्या उपयोगात घरबसल्या विविध वस्तु घेणे म्हणजे ऑनलाईन खरेदी आजकार सर्रास केली जाते. सुरक्षित आणि सजग राहून शॉपिंग केल्यास ऑनलाईन खरेदीचे फायदे जास्त असल्याचे अनुभव येतात. ही खरेदी केवळ □प्सच्या एका क्लिकवर होत असल्यामुळे वेळेची बचत होते. खरेदीपूर्वी सुरक्षित खरेदी कशी करावी याची माहिती देणाऱ्या वेबसाईट, यु-ट्युब व्हिडीओ पाहून घ्यावेत. या वेबसाईटवर ग्राहकांचे विविध चांगले, वाईट अनुभव दिलेले असतात आणि प्रोजेक्टचा दर्जाही समजायला मदत होते. तसेच ज्या वस्तु आपण खरेदी करणार आहोत, त्या कंपनीची ऑनलाईन खरेदी संदर्भातील माहिती तपासून घ्यावी. त्यामुळे होणारी संभाव्य फसवणूक टाळता येते. कंपनीची किंवा वेबसाईटची सत्यता तपासूनच खरेदी करावी. खरेदी झाल्यानंतर आर्थिक तपशिल भरतांना काळजी घ्यावी. आपल्या बँकेची खरी वेबसाईट लिंक दिलेली असेल तरच त्याचे तपशील भरावेत. शक्यतो कॅश ऑन डिलिव्हरी हा पर्यायाच निवडावा. त्यामुळे खरेदी करतांना काही चुक झाल्यास आपण दिलेल्या रक्कमेचा घोळ होत नाही.

**ऑनलाईनच्या शॉपिंग संकल्पना :**

खरेदीची अशी पद्धत की प्रत्यक्ष दुकानात न जाता कम्प्युटर, मोबाईल वापरून इंटरनेटच्या माध्यमातून करता येणारी खरेदीची पद्धत होय.

घरबसल्या जगभरातील माणसं असे इंटरनेटवरून शॉपिंग करू लागले. परिणामी वेळ व श्रमाची बचत होवू लागली, शिवाय भरपूर व्हेरायटी आणि कमी दरामध्ये शॉपींग होवू लागली. वेगवेगळ्या खरेदी □प्सद्वारे वेगवेगळ्या वस्तुंची व खरेदी करण्याची संकल्पना म्हणजे ऑनलाईन शॉपींग होय. याद्वारे लाखो-करोडो रूपयांची उलाढाल होताना दिसून येते.

**ऑनलाईन खरेदी करता येणाऱ्या वस्तु :**

ऑनलाईन पद्धतीने विविध जीवनावश्यक वस्तुंची खरेदी करता येते. लहान मुलांच्या डायपर्सपासून ते चमच्यापर्यंत, कपडे, भांडे, इलेक्ट्रीक वस्तु, रेल्वे-बस-विमान बुकींग, सिनेमा टिकिटे, हॉटेल बुकिंग, नोकरीसाठी माणसे, सर्व काही ऑनलाईन पद्धतीने शोधता/घेता येते. याचाच अर्थ नुसत्या वस्तुच नाही तर ऑनलाईन पद्धतीने वेगवेगळ्या सेवा सुद्धा उपलब्ध होतात.

ऑनलाईन शॉपींग ही 1999-2000 मध्ये इंटरनेट शॉपींग सुरू झाली. जगभरातील माणसं इंटरनेट वापरू लागली. याच काळात विविध बुकस्टोअर सुरू केले, त्याचेच नाव □मेझॉन डॉट कॉम हे पहिलं असं स्टोअर होतं जे प्रत्यक्षात नव्हतंच, फक्त ऑनलाईनच होतं. □मेझॉन जगभरात चटकन लोकप्रिय झालेलं दिसून येते. त्यांनीही ऑनलाईन पुस्तकं विकायला सुरवात केली. त्यानंतर मग Yahoo, MSN, यासाठी पोर्टलस् सुरू झाली आहेत.

ऑनलाईन शॉपींग हे खुप फास्ट व घरबसल्या होते. तसेच ते तुलनेनं स्वस्त असतं, कारण दुकानासाठीची जागा, होलसेलर, रिटेलर या चेनमध्ये वस्तुची जी किंमत वाढते, ती न वाढवता उत्पादक थेट ग्राहकाला वस्तु देतो. त्यामुळे वसतु घरबसल्या मिळतात, तसेच रात्री-बेरात्री वाटेल तेंव्हा तुम्ही खरेदी करू शकता. ई-कॉमर्समुळे दैनंदिन कार्य एवढी सोयीस्कर झाली की बसल्या बसल्या विविध सेवांचे बिल पे करता येते. भाजीपाला सुद्धा ऑनलाईन पद्धतीने ऑर्डर करता येतो. बाजारभावापेक्ष ऑनलाईन किंमत कमी असलेली दिसून येते.

**गृहितके :**

- ऑनलाईन पद्धतीने खरेदी ही स्वस्त, सोपी व फायदेशीर आहे.
- वेळ, पैसा व श्रम यांची बचत होते.
- खरेदी करतांना जागृक असणे आवश्यक आहे.
- ऑनलाईन खरेदी करतांना जोखीम असते.
- ऑनलाईन खरेदी ही काळजीपूर्वक करणे गरजेचे आहे.
- खेरदी करतांना जोखीम स्विकारावी लागते.

खरेदीपूर्वी सुरक्षित खरेदी होणे गरजेचे असते. त्यामुळे वेबसाईटवर, यु-ट्युब व्हिडीओ पाहून घ्यावेत. संबंधित वेबसाईटवरून खरेदी केलेल्या इतर ग्राहकाची अनुभवे जाणून घ्यावे, म्हणजे रिमार्क वाचून आपण खरेदीपूर्वी हवे ते निर्णय घेवू शकतो. कंपनीची किंवा वेबसाईटची सत्यता तपासून पाहावी. खरेदी झाल्यानंतर आर्थिक तपशिल भरतांना काळजी घ्यावी. आपल्या बँकेची खरी वेबसाईट लिंक दिलेली असेल तरच तपशील भरावेत. खरेदी झाल्यानंतर आलेले ई-बिल तपासून घ्यावे व त्याची कॉपी सेव्ह करून ठेवावी. आपल्या बँकेशिवाय आणि ऑनलाईन खरेदी कंपनीशिवाय इतर कोणत्याही मध्यस्थ ऑनलाईन वेबसाईटवरून आर्थिक व्यवहार करू नयेत.

वस्तु बदल करायची असल्यास परत घेण्यासाठी काही दिवस मर्यादा असतात, तोपर्यंत ती वस्तु परत करता येते. वस्तु खराब असो की चांगली, आवडली नाही तर ती परत करता येते. त्यासाठी आपल्याला पैसे परत मिळतात किंवा दुसरी वस्तु सुद्धा विकत घेता येते.

**आचार-विचारामध्ये ई-शॉपींगमुळे झालेले बदल :**

ग्राहकांचे उत्पन्न् नियमित आहे की अनियमित यावर त्यांचे निर्णय पुष्कळ अंगी अवलंबून असतित. नियमित उत्पन्नाचा खर्च करतांना व अनियमित उत्पन्नाचा खर्च करतांना ग्राहकांचे निर्णय हे वेगवेगळे असतात. कारण गरीब ग्राहक हे किंमत व उपयुक्ततेला तर श्रीमंत ग्राहक हे दर्जा व दिखाऊपणाला, सोयीला जास्त महत्व देतांना दिसून येतात.

खरेदी करतांना कोणी कपड्याला तर कोणी सिनेमा तिकीट, कोणी भांडी तर कोणी बुक्सला महत्व देतांना दिसून येतात. पुर्वी गरजेच्या वस्तुंच्या उपभोगाला जास्ति महत्व दिले जायचे. तर एखाद्या वस्तुचा वारंवार उपयोग केल्यास तिची सवय लागत असते. तर काही प्रेरकांचा भावनांशी जास्त संबंध असल्याकारणाने भावनीक होवून खरेदी ही वेगवेगळया प्रकारे होताना दिसून येते. समाजात चांगले दिसावे म्हणून वेगवेगळी खरेदी केली जाते व पैसा गुंतवल्या जातो. विक्री करतांना किंवा खरेदी करतांना ती खरेदी कोणत्या प्रकारची आहे, भावनिक दृष्टीकोन, सांस्कृतीक दृष्टीकोन यांचा सारासार विचार केला जातो व आनंद व्दिगुणीत केल्या जातो.

ज्या ग्राहकांना ई-कॉमर्सचे ज्ञान असते असे ग्राहक ऑनलाईन खरेदी करतांना कमी फसविले जाण्याची शक्यता असते. असे ग्राहक आणि व्यापारी या दोहोंसाठीही कमतरतांपेक्षा ई-कॉमर्सचे फायदेच जास्त आहेत. व्यवसाय संधी म्हणून देखील ई-कॉमर्सचे फायदेच जास्त दिसून येतात. काळानुसार स्थानिक व भौतीक व्यवसाय, इलेक्ट्रॉनीक्स व्यवसायाचे पुरक आणि विस्तारीत म्हणून उदयास येतांना ई-शॉपींग दिसते. कारण ऑनलाईन खरेदीचे फायदे आणि तोटे, त्या व्यवसायाची भरभराट होणे व ग्राहक यांच्या खरेदीवर अवलंबून आहे. त्यामुळे जास्त असलेल्या सकारात्मक गोष्टी नकारात्मक गोष्टीला मात करतांना दिसून येतात.

**ऑनलाईन खरेदीचे फायदे :**

- किंमतीच्या तुलना करण्यासाठी सहज वेग प्राप्त होतो.
- सवलतीच्या कुपनची उपलब्धता व ऑफर.
- प्रत्येक उत्पादनाचे वैयक्तिकरीत्या वितरण.
- सुरक्षीत खरेदीची हमी.

**ऑनलाईन खरेदीचे तोटे :**

- कॉस्मेटीक तुम्ही ट्राय न करता ऑर्डर करीत असल्यास, नाही आवडले तरी परत करता येत नाहीत.
- बाकी आवडले की समाविष्ट करेन.
- वस्तु हाताळून, ट्रायल करून घेऊ शकत नाही.
- खरेदी करतांना बाहेर पडणे बंद होते.
- दुकानात काही चांगल्या ऑफर्स मिळू शकतात.
- काही वेळेला बघुन घेतलेल्या वस्तु जास्त उपयुक्त ठरू शकतात.
- नवी ठिकाणे, नव्या व्यक्ती यांचे सहज होणारे दर्शन बंद होते.

**निष्कर्ष :**

1. ऑनलाईन खरेदीचे नुकसान कमी व फायदेच जास्त दिसून येतात.
2. ऑनलाईन खेरदीमुळे पैसा, वेळ आणि श्रमाची बचत होते.
3. होणारी फसवणूक टाळता येते.
4. बाजारभाव सारखा असतो.
5. कंपनिच्या वस्तु असल्यामुळे नुकसान भरपाई मिळू शकते.
6. कॅश ऑन डिलिव्हरीचा पर्याय निवडावा, त्यामुळे रक्कमेमध्ये घोळ होत नाही.